वाचा:-१. ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मालंक दिनांक २२/०२/२०१९
२. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.गावठाण/ड्रोन/SOP/प्र.क्र.१४२/२०२० पुणे दिनांक २३/११/२०२०
३. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र./एसव्हीसीआर १०७९/त२/१९९६ पुणे दि. २१/०९/१९९६
४. UNIFIED DEVELOPMENT CONTROL AND PROMOTION REGULATIONS FOR MAHARASHTRA STATE मधील मुद्दा क्र.2.6.1(iii) मधील तरतुद.

---

**परिपत्रक**

क्र.गावठाण /स्वामित्व/पुनर्वसित गावे/
परिपत्रक क्र.०४/२०२४
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (म.राज्य), पुणे यांचे कार्यालय
पुणे दिनांक :-०७/०८/२०२४

**विषय:- गावठाण जमाबंदी प्रकल्प-"स्वामित्व योजना"
पुनर्वसित गावांचे अधिकार अभिलेख व नकाशे तयार करणे बाबत.**

**प्रस्तावना-**

महाराष्ट्र राज्यात गावठाण जमाबंदी प्रकल्प-" स्वामित्व" योजना प्रगतीपथावर आहे. सदर योजनेअंतर्गत पुनर्वसित गांवाचे कार्यालयाकडील परिपत्रक क्र.गावठाण/ड्रोन/SOP/प्र.क्र.१४२/२०२० पुणे दिनांक २३/११/२०२० मधील तरतुदीनुसार विहीत कार्यवाही करणेत येत आहे.

या कार्यालयाकडील परिपत्रक क्र./एसव्हीसीआर १०७९/त२/१९९६ पुणे दि.२१/०९/१९९६ व UNIFIED DEVELOPMENT CONTROL AND PROMOTION REGULATIONS FOR MAHARASHTRA STATE मधील मुद्दा क्र.2.6.1(iii) मधील तरतुदीनुसार मोजणी करून येणारे क्षेत्र कायम करुन आवश्यकत तेथे दुरूस्त अभिन्यास अंतिम मंजूरीसाठी अभिन्यास मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी यांचेकडे सादर करावा. व त्यास अंतिम मंजुरी(Final approval) प्राप्त झालेवर मगच अभिलेख दुरूस्त करणेची कार्यवाही करावी या बाबत सविस्तर पणे नमूद केलेले आहे.

स्वामित्व योजनेत पुनर्वसित गावांचे अधिकार अभिलेख व नकाशे तयार करताना संबंधित क्षेत्रिय भूमि अभिलेख कार्यालयाने पुनर्वसित झालेल्या गावांची अधिसुचना व मंजूर रेखांकन संबंधित पुनर्वसन कार्यालयाकडून /भूसंपादन कार्यालयाकडून प्राप्त करून घेवून नियमानुसार पुढील चौकशीचे काम करणे आवश्यक आहे. तथापी काही ठिकाणी संबंधित पुनर्वसन/भूसंपादन कार्यालयाकडून प्राप्त मंजूर रेखांकन/अभिन्यास(Layout) व जागेवरील परिस्थिती यात तफावत येत आहे.तसेच काही ठिकाणी संबंधित पुनर्वसन/भूसंपादन कार्यालयाकडून अपुर्ण किंवा कोणतेही अभिलेख प्राप्त होत नाहीत.

तरी पुनर्वसित गावांच्यासाठी करावयाची कार्यवाही बाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना देणेबाबत इकडील कार्यालयाच्या विचारधीन होते त्यानुसार या परिपत्रकाव्दारे गावठाण जमाबंदी प्रकल्प-" स्वामित्व" योजने अंतर्गत पुनर्वसित गावांचे अधिकार अभिलेख व नकाशे तयार करणे बाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत.

**मार्गदर्शक सुचना:-**

**१. पुनर्वसित गावांचे अधिसुचना घोषित होवून मंजूर रेखांकन(Layout), कमी जास्त पत्रक, आकारबंद, अधिकार अभिलेख(७/१२) व इतर अभिलेख उपलब्ध झाले असल्यास:-**

१.१ ज्या गावांचे पुनर्वसन झालेले आहे त्या गावांची अधिसुचना व मंजूर रेखांकन संबंधीत पुनर्वसन कार्यालयाकडून /भूसंपादन कार्यालयाकडून प्राप्त करून घ्यावे.



Scanned with OKEN Scanner

१.२ पुनर्वसित गावासाठी निश्चित केलेले सर्व्हे नंबर/ गट नंबर यांच्या संयुक्तिक बाह्यसीमा ही गावठाण हद्द म्हणून विचारात घ्यावी.

१.३ तदनंतर पुनर्वसित गावठांणामध्ये गावठाण जमाबंदी प्रकल्प-" स्वामित्व" योजने अंतर्गत ठरवून दिलेल्या वाचा क्र.२ मधील तसेच महाराष्ट्र शासन/या कार्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/परिपत्रक/आदेशामधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

१.४ पुनर्वसित गावठांणामध्ये गावठाण जमाबंदी प्रकल्प-" स्वामित्व" योजने अंतर्गत मिळकत पत्रिका तयार होवून गाव परिरक्षणासाठी घेणेत आले नंतर संबंधीत गावचे गावकामगार तलाठी यांना सदर ७/१२ बंद करणेबाबत स्वतंत्र आदेश देणेत यावे. तसेच सदर आदेशाची प्रत e-PCIS, कार्यालय अधीक्षक, जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे यांचेकडे माहितीस्तव सादर करावी.

**२. सक्षम प्राधिकारी यांच्याकडून पुनर्वसित गावाच्या गावठाणाची अधिसुचना घोषित केली आहे तथापी कमी जास्त पत्रक तयार न झाल्यामुळे पुढील कोणतेही कार्यवाही झालेली नसल्यास संबंधित उप अधीक्षक भूमि अभिलेख यांनी प्रथमत: अभिलेख दुरूस्तीची कार्यवाही विनाविलंब करावी. तदनंतर वरील १ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचना प्रमाणे कार्यवाही करावी.**

**३. मोजणीअंती जागेवरील कब्जेवहिवाट व मंजूर रेखांकनामध्ये तफावत असल्यास:-**

सक्षम प्राधिकारी यांच्याकडील प्राप्त अधिसुचना व रेखांकन यांचे आणि संबंधित खातेदारांच्या जागेवरील कब्जेवहिवाट यांच्यामध्ये तफावत असल्यास संबंधित चौकशी अधिकारी यांनी क्षेत्र व हद्दी यांचा मंजूर व प्रत्यक्ष कब्जेवहिवाट यांचा प्रारूप नकाशासह सविस्तर अहवाल खालील नमूद प्रमाणे तयार करून वाचा क्र.३ व ४ मधील तरतुदीनुसार अभिन्यास मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी यांचेकडे अंतिम मंजूरीसाठी सादर करावे. अंतिम मंजूरी प्राप्त झालेनंतर वरील १.३ व १.४ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचना प्रमाणे कार्यवाही करावी.

**मोजणीअंती जागेवरील कब्जेवहिवाट व मंजूर रेखांकनामध्ये तफावतीचा तपशिल**

| अ. क्र. | मंजूर रेखांकना मधील भूखंड क्रमांक | मंजूर अधिसुचना/ रेखांकनानुसार | | जागेवरील प्रत्यक्ष ताबेवहिवाटी प्रमाणे | | तफावत | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | खातेदाराचे नांव | क्षेत्र | खातेदाराचे नांव | क्षेत्र | खातेदाराचे नांव | क्षेत्र |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

**४. अधिसुचना किंवा ७/१२ उपलब्ध आहे परंतू रेखांकन उपलब्ध न झाल्यास:-**

सदरचे रेखांकन ज्या प्रयोजनार्थ पुर्नवसन केले आहे त्या विभागाकडील मुख्य कार्यकारी अभियंता यांचेकडे कसुन शोध घ्यावा व तदनंतर सुध्दा सदरचा आराखडा/रेखांकन उपलब्ध न झालेस सक्षम प्राधिकारी यांच्याकडील प्राप्त अधिसुचना किंवा ७/१२ उपलब्ध असल्यास संबंधित खातेदारांच्या जागेवरील कब्जेवहिवाटीचा प्रारूप नकाशासह सविस्तर अहवाल वाचा क्र.३ व ४ मधील तरतुदीनुसार अभिन्यास मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी यांचेकडे अंतिम मंजूरीसाठी सादर करावे. अंतिम मंजूरी प्राप्त झालेनंतर वरील १.३ व १.४ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचना प्रमाणे कार्यवाही करावी.

**मोजणीअंती जागेवरील कब्जेवहिवाट याचा तपशिल**

| अ. क्र. | मंजूर अधिसुचना/ ७-१२ प्रमाणे | | जागेवरील प्रत्यक्ष ताबेवहिवाटी प्रमाणे | | तफावत | |
|---|---|---|---|---|---|---|
| | खातेदाराचे नांव | क्षेत्र | खातेदाराचे नांव | क्षेत्र | खातेदाराचे नांव | क्षेत्र |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |



Scanned with OKEN Scanner

५. गावठाण जमाबंदी प्रकल्प स्वामित्व योजनेत पुनर्वसित गावांचे चौकशीकामी ज्या तालुक्यातील संबंधित गाव आहे त्याच तालुक्यांचे उप अधीक्षक भूमि अभिलेख यांचीच चौकशी कामी नियुक्ती करणेत यावी.

**सदरचे परिपत्रक दिनांक २२/०२/२०१९ पासून गावठाण जमाबंदी प्रकल्प-स्वामित्व योजने अंतर्गत कार्यवाही पुर्ण झालेल्या किंवा होणाऱ्या गांवासाठी पुर्वलक्षी प्रभावाने लागू होईल.**

Signed by
Sachindra Pratap Singh
Date: 07-08-2024 18:24:30

**(सचिंद्र प्रताप सिंह)**
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक**
**भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य),पुणे**

प्रत:- १. अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक भूमि अभिलेख, पुणे यांना माहितीस्तव.
२. उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (भूमापन,एकत्रीकरण)पुणे यांना माहितीस्तव.
३. उपसंचालक भूमि अभिलेख पुणे/मुंबई/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर यांना माहिती आवश्यक कार्यवाहीसाठी.
४. सर्व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
५. सर्व उप अधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी/विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
६. सर्व उप अधीक्षक भूमि अभिलेख तथा चौकशी अधिकारी यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.



Scanned with OKEN Scanner